# **प्रेस नोट**

दि.२०/०३/२०१९
अकोला

सायबर दोस्त आपल्या मदतीला !

*''एक चांगला मित्र आपल्या वाईट काळातही आपली मदत करतो''* तशाचप्रकारची मदत आपल्याला सायबर दोस्त करणार आहे गृहमंत्रलय, भारत सरकार व महाराष्ट्र सायबर, मुंबई यांचे तर्फे

''सायबर दोस्त'' आपल्या मदतीला येत आहे या मित्राच्या मदतीमुळे आपल्याला सोशल मिडीयावरील होण्या-या नवनविन सायबर गुन्हयांना आपण बळी पडू नये तसेच आपली आर्थिक/मानसिक फसवणुक, हानी किंव नुकसान होवू नये याकरीत प्रतिबंधत्मक उपाययोजनेचा वापर करुन आपल्यामध्ये जनजागृती होवून आपली फसवणुक टाळता येईल.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात गुन्हेगार वेगवेगळया कार्यप्रणाली वापरुन विविध प्रकारचे सायबर गुन्हे करीत आहेत. त्याला सर्वसाधारण नागरीक बळी पडत आहेत. त्या संदर्भात नागरीकांमध्ये सायबर गुन्हयांबाबत जनजागृती करण्यासाठी व सायबर गुन्हयांसंदर्भात, घ्यावयाची दक्षता व प्रतिबंधक उपाय करण्यासाठी केंद्र शासनाने भारत सरकार गृह मंत्रालय यांचे कडून **@Cyber Dost** ला फॉलो करण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

सद्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असल्याने सर्वांना सोशल मिडीया उदा. फेसबुक, व्हाट्सअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम इ. त्याचप्रमाणे ऑनलाईन व्यवहार हे आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनले आहेत. परंतु आपल्यापैकी बहुतेकांना हे माहिति सुध्दा नसते की वरिल बाबी व्यवस्थीत जर हाताळले नाही तर आपल्याला ज्या गोष्टी सोयीस्कर वाटतात त्याच त्रासदायक ठरु शकतात.

तसेच सायबर क्राईम संदर्भात जनजागृती करावी व सायबर गुन्हयांसंदर्भात ज्ञान, घ्यावयाची दक्षता व प्रतिबंधक उपाय करणेसाठी केंद्र शासनाने कार्यान्वीत केले **MHATwitter handle @Cyber Dost** ला फॉलो करणेसाठी तसेच महाराष्ट्र सायबरचे **Twitter handle** **https://twitter.com/MahaCyber1** व **Facebook** **https://www.facebook.com/MahaCyber/** ला फॉलो करणेसाठी अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

SD/-
**(विलास पाटील)**
पोलीस निरीक्षक,जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय, अकोला

**प्रति,**

**मा.संपादक ,**
**कृपया आपल्या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.**